सत्यमेव जयते

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

## (२०१७-२०१८)

**" मुंबईमध्ये देशभरातून उपचारासाठी आलेल्या कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय होण्याबाबत " या विषयावरील ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा**

# अहवाल

(दिनांक    मार्च २०१८ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई.

मार्च, २०१८

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

## (२०१७-२०१८)

**" मुंबईमध्ये देशभरातून उपचारासाठी आलेल्या कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय होण्याबाबत " या विषयावरील ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा**

# अहवाल

## विनंती अर्ज समिती

## (२०१७-२०१८)

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(४) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.

(५) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

*(१) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

*(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**(३) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM)

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

*ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. व ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांची दिनांक ३ नोव्हेंबर २०१७ रोजी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांची दिनांक ३१ जानेवारी २०१८ रोजी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

## विनंती अर्ज समिती

## (२०१६-२०१७)

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

*(२) श्री. गिरीष व्यास, वि.प.स.

*(३) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

*(४) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(६) श्री. कपिल पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. यु. के. चव्हाण, सचिव

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

*सर्वश्री पांडुरंग फुंडकर, प्रकाश बिनसाळे, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागी अनुक्रमे सर्वश्री गिरीष व्यास, तानाजी सावंत, आनंद ठाकूर, वि.प.स. यांची दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

## प्रस्तावना

" मुंबईमध्ये देशभरातून उपचारासाठी आलेल्या कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय होण्याबाबत " या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी दिनांक ३१ जुलै २०१७ रोजी दिली व दिनांक १० ऑगस्ट २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज सार्वजनिक आरोग्य, नगरविकास तसेच महसूल व वन (महसूल) विभागाकडे पाठविण्यात आला. त्या संबंधीची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाकडून ४ ऑक्टोबर २०१७ व महसूल व वन (महसूल) विभागाकडून दिनांक २२ फेब्रुवारी २०१८ रोजी प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणा-या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय प्रधान सचिव, जिल्हाधिकारी, मुंबई व अन्य अधिका-यांच्या दिनांक ४ ऑक्टोबर २०१७ व २३ फेब्रुवारी २०१८ रोजी साक्षी नोंदविल्या.

विनंती-अर्जासंबंधी विभागाने पाठविलेली माहिती (परिशिष्ट-दोन) तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वंकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक २० मार्च २०१८ रोजीच्या बैठकीत संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २० मार्च २०१८.

**माणिकराव ठाकरे,**
उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद *तथा*
समिती प्रमुख, विनंती-अर्ज समिती.

# अहवाल

मी, विधानपरिषद विनंती-अर्ज समितीचा समितीप्रमुख, समितीच्या वतीने हा अहवाल सादर करीत आहे.

" मुंबईमध्ये देशभरातून उपचारासाठी आलेल्या कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय होण्याबाबत " या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी दिनांक ३१ जुलै २०१७ रोजी दिली व दिनांक १० ऑगस्ट २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

अर्जदारांनी विनंती-अर्जात नमूद केले आहे की, भारतामध्ये प्रतिवर्षी ४.७ लाख कॅन्सरचे नवीन रुग्ण आढळून येत असून त्यापैकी साधारणतः ३.५ लाख रुग्ण दगावत असल्याचे निदर्शनास आले आहे. मुंबईतील टाटा मेमोरियल रुग्णालयांमध्ये कॅन्सरचा उपचार वाजवी दरात उच्च प्रतिचा होत असल्यामुळे व गोरगरिब नागरिकांना मुंबई शहर सोईचे असल्याने, महाराष्ट्रातील तसेच देशातील अनेक राज्यांतील नागरिक मुंबईत उपचारासाठी येतात. परंतु, कॅन्सर रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी राहण्याची कोणतीच सोय या भागात दिसून येत नाही त्यामुळे रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांना रुग्णांच्या उपचारावरील खर्चासोबत राहण्यासाठी देखील प्रचंड खर्च सोसावा लागतो. मुंबईत टाटा मेमोरियलच्या परिसरात कॅन्सर रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी राहण्याची सोय होण्याबाबत कार्यवाही व्हावी अशी विनंती अर्जात केलेली आहे.

सदर समितीच्या दिनांक ४ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या बैठकीच्या वेळी सार्वजनिक आरोग्य विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट- दोन अ) नमूद केले आहे की, टाटा मेमोरियल रुग्णालय हे परेल, मुंबई येथे स्थित आहे. कॅन्सर वर उपचार देणारे केंद्र तसेच कॅन्सर प्रतिबंध, उपचार, शिक्षण आणि संशोधन यांच्याशी निगडीत भारतातील एक प्रमुख केंद्र आहे. १९६२ पासुन सदर रुग्णालय अणुऊर्जा विभागांमार्फत ग्रँट-इन-एड इन्स्टिट्युट असून ही संपूर्णपणे अणुऊर्जा विभागामार्फत अनुदानीत आहे व अणुऊर्जा विभाग, भारत सरकार यांच्या अधिकार क्षेत्रात आहे.

सद्यःपरिस्थितीत टाटा मेमोरियल रुग्णालयामार्फत रुग्णांच्या नातेवाईकांसाठी राहण्यासाठी बोरजेस होम, बांद्रा या ठिकाणी १५० खाटांची राहण्याची व्यवस्था केलेली आहे. टाटा मेमोरियल रुग्णालय येथे देशातील तसेच राज्यातील विविध विभागातून लोक हे उपचार घेण्याकरिता येतात.

रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांच्या राहण्याची अपुरी सोय लक्षात घेता टाटा मेमोरियल रुग्णालयामार्फत खाजगी स्वयंसेवी संस्था, चारिटेबल ट्रस्ट यांची ही मदत घेतली जाते.

राज्य शासनाकडून हाफकिन ह्या संस्थेमधील जमीन धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यासाठी टाटा मेमोरियल रुग्णालयाला उपलब्ध करून देण्यात आली आहे, सदर जागेवर रुग्णांना व रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्यासाठी अदांजित १५० खाटांचे धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यात येणार आहे.

खारघर, नवी मुंबई येथे टाटा मेमोरियल रुग्णालयाच्या ॲडव्हॉन्स सेंटर फॉर ट्रिटमेंट, रिसर्च आणि एज्युकेशन सेंटर मध्ये धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यासाठी जागा उपलब्ध करण्यात येणार आहे.

महसूल विभागाने टाटा मेमोरियल रुग्णालयाला इन्स्टिट्युट मधील ५ एकर जमीन कॅन्सर रुग्णालय व संशोधन केंद्रासाठी सन २०१३ मध्ये भाडेतत्वावर दिली आहे. याजागेवर १५० बेडचे रुग्णालय व धर्मशाळा उभारण्यासाठी बांधकामाला सुरूवात करण्यात येणार होती. या बांधकामास उशीर झाल्यामुळे सन २०१६ ला त्यांनी पुन्हा वापर बदलविला व त्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. टाटा रुग्णालयाला लागून असलेल्या एका चाळीचा सन २००४ मध्ये ३३ (३) विकास करण्याचे नियोजन होते. त्यामध्ये टाटा रुग्णालयाची २५२ स्क्वेअर मीटर जागा घेऊन दुसरा प्लॉट रुग्णालयाला देण्यात यावा तो प्लॉट ही त्याच परिसरात आठशे मीटर वर आहे. या आठशे मीटरवर दोन लाख स्क्वेअर मीटरचे बांधकाम होऊ शकते. जेणेकरून २७० रुग्णांना त्या ठिकाणी स्थंलातरित करण्याबाबतचा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे प्रलंबित आहे. नगर विकास विभागाकडून याविषयाच्या अनुषंगाने जागा अदलीबदली करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. सन २०१४ ते २०३४ या कालावधीसाठी मुंबई महानगरपालिकेने रिव्हाईज डी.पी. तयार केला आहे. महापालिकेच्या मालकीचे आचार्य दोंदे मार्गावर जी. एल. पाटील मार्केट आहे. टाटा रुग्णालयापासून अवघ्या तीनशे मीटर अंतरावर असलेल्या मार्केटचे रि-डेव्हलपमेंट करीत असताना या ठिकाणी मार्केट आणि डॉर्मेटरी करीत असल्याने वाढीव एफ.एस आय. मुळे तो भूखंड साधारण १५०० चौरस मीटरचा होईल त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांसाठी १०० खोल्या उपलब्ध होतील. महापालिकेकडून बांधकाम प्रस्तावाला मान्यता मिळावी व नगर नियोजन विभागाने रुग्णालयासाठी जागा आरक्षित करण्याबातचा प्रस्ताव महसूल व वित्त विभागाच्या अभिप्रायासाठी लवकरात लवकर पाठवावे व विभागांमधील समन्वयाअभावी विषय प्रलंबित राहू नये याविषयाशी निगडीत असलेल्या सर्व संबंधित विभागाच्या सचिवांनी अद्यावत माहितीसह व दिलेल्या निर्देशानुसार पुढच्या बैठकीस

उपस्थित राहावे असे निर्देश समितीने दिले. याप्रकरणाचे गांभीर्य प्रशासनाने जरूर लक्षात घ्यावे सदर प्रकरण लोकहितास्तव अत्यंत महत्वाचे असल्यामुळे समितीनेही ते अतिशय गांभीर्याने घेतले आहे.

सदर विषयाचा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने समितीने पुन्हा दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी महसूल विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन ब) मध्ये असे नमूद केले आहे की, शासन निर्णय क्र. जमीन-२५१२/१९६/ प्र.क्र. ७८/ज-२, दिनांक २१ फेब्रुवारी २०१३ अन्वये परेल-शिवडी विभागातील भूकर क्र. १/३३० व भूकर क्र. ३३० मधील पाच एकर जागा टाटा मेमोरियल सेंटरला बाल व महिला कॅन्सर रुग्णालय व हायड्रोन बीम थेरपीसाठी राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्याकरीता नाममात्र भुईभाड्याने ३० वर्षांसाठी मंजूर करण्यात आली होती.

या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार या जागेमध्ये हाफकिन संस्थेची निवासंस्थाने येत असल्याने या निवासंस्थाना ऐवजी टाटा मेमोरियल सेंटरने हाफकिन संस्थेस दोन पर्यायी इमारती स्वखर्चाने बांधून द्याव्यात असे ठरले होते.

तथापि, दिनांक ५ सप्टेंबर २०१३ च्या शुद्धीपत्रान्वये या पर्यायी इमारतीऐवजी टाटा मेमोरियल सेंटरने हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, परळ, मुंबई या संस्थेस ठोक स्वरूपात रुपये ५ कोटी रक्कम सुपूर्द करण्याबाबत आदेश झाले.

तद्नंतर टाटा मेमोरियल सेंटरमार्फत उभारण्यात येणा-या हायड्रोन बीम थेरपीसाठी आवश्यक असलेली जागा व त्यातून प्रसारीत होणारी किरणोत्सारीता यांचे प्रमाण विचारात घेता हायड्रोन बीम थेरपी ऐवजी रेडिओ थेरपी या उपचार पद्धतीस मान्यता देण्याबाबत दिनांक २९ ऑगस्ट २०१६ च्या शुद्धिपत्रान्वये सुधारणा करण्यात आली.

टाटा मेमोरियल सेंटरमार्फत दिनांक १२ सप्टेंबर २०१७ रोजीच्या पत्रान्वये रुग्णालय बांधकामाकरिता दिलेल्या मुदतीत बांधकाम पूर्ण होणे शक्य नसल्याचे कळवून रुग्णालय बांधणेकरीता पाच वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत शासनास विनंती करण्यात आलेली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र. २५४/ज-१, दिनांक ११ जानेवारी २०१७ मधील तरतुदीनुसार टाटा मेमोरियल सेंटर यांचा बांधकाम मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव उचित कार्यवाहीकरीता शासनाच्या पत्र दिनांक ७ नोव्हेंबर २०१७ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

मुख्य प्रशासकीय अधिकारी, टाटा मेमोरियल सेंटर परळ, मुंबई यांचे दिनांक १ नोव्हेंबर २०१७ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, संदर्भाधिन दिनांक २१ फेब्रुवारी २०१३ च्या शासन निर्णयात मुद्दा क्रमांक २ येथे सदर जमीन बाल व महिला कॅन्सर रुग्णालय व हायड्रोन बीम थेरपीसाठी राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्याकरिता मंजूर करण्यात आल्याचे नमूद केल्यामुळे संस्थेला या जमिनीवर निवासी डॉक्टरांची निवासस्थाने, रुग्णांसाठी धर्मशाळा व तत्सम आवश्यक सुविधा उभारण्याकरिता महानगरपालिका किंवा तत्सम प्राधिकरणांकडून परवानगी मिळण्यास अडचणी येत आहेत. यास्तव जमिनीच्या अनुज्ञेय वापराच्या प्रयोजनाचा निवासी डॉक्टरांची निवासस्थाने, रुग्णांसाठी धर्मशाळा व तत्सम आवश्यक सुविधा उभारण्यासाठी विस्तार करण्याची संस्थेची विनंती शासनाच्या विचाराधीन होती.

त्यावेळी मागील बैठकीत सदर प्रकरणात महापालिकेकडून बांधकाम प्रस्तावाला मान्यता मिळावी व नगर नियोजन विभागाने रुग्णालयासाठी जागा आरक्षित करण्याबाबतचा प्रस्ताव महसूल व वित्त विभागाच्या अभिप्रायासाठी लवकरात लवकर पाठवावे व विभागांमधील समन्वयाअभावी विषय प्रलंबित राहू नये असे सांगण्यात आले होते. त्यासंबंधी शासनाकडे माहिती प्राप्त झाली आहे काय याबाबत समितीने विचारणा केली असता सचिव, महसूल व वन (महसूल) यांनी खुलासा केला की, टाटा मेमोरियल सेंटरला बाल व महिला कॅन्सर रुग्णांसाठी ५ एकर जागा फेब्रुवारी, २०१३ मध्ये शासन आदेश काढून दिलेली आहे. टाटा मेमोरियल सेंटर हायड्रोन बीम थेरपीसाठी राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्यासाठी नाममात्र भुईभाड्याने जमीन तीस वर्षांसाठी देण्यात आली होती. या जागेमध्ये हाफकिन ची निवासस्थाने आहेत त्याऐवजी टाटाने हाफकिन इन्स्टीट्युटला स्वतंत्ररित्या दोन इमारती स्टॉफ कॉटर्स साठी बांधून देण्याऐवजी बांधकामाचा खर्च म्हणून ५ कोटी रुपये टाटा मेमोरियल सेंटरनी हाफकिन इन्स्टीट्यूटला द्यावे अशी सुधारित अट मागच्या वेळी दिल्याप्रमाणे टाटा मेमोरियल सेंटरनी हाफकिन इन्स्टिट्यूटला तीन कोटी रुपये दिले आहे उर्वरित दोन कोटी रुपये देणे लागत आहे. हायड्रोन बीम थेरपी यासाठी लागणारी जागा हाफकिन इन्स्टिट्यूट येथे उपलब्ध नाही असे टाटा मेमोरियल सेंटरच्या निदर्शानास आले. त्यामुळे त्यांनी ट्रीटमेंटची पद्धत बदलून हायड्रोन बीम थेरपी ऐवजी रेडिओ थेरपी या उपचार पद्धतीस मान्यता मिळावी अशी शासनास विनंती केली व शासनाने सन २०१६ मध्ये शुध्दिपत्रक काढून वरील वापरातील बदल अनुज्ञेय केला आहे. डॉक्टर यांची निवासस्थाने व रुग्णांच्या नातेवाईकांची निवासाची व्यवस्था असा अनुषंगिक बदल वापराच्या प्रयोजनासाठी करून द्यावा अशी विंनती शासनाकडे प्राप्त झाली होती. यासंबंधातील निर्णय येत्या दोन तीन आठवड्यात शासन स्तरावर झाल्यावर वापराच्या बदलातील सुधारणा झाल्यावर तशा प्रकारचा आदेश देण्यात येईल. हा एकच विनंती बदल शासनाकडे प्रलंबित आहे.

यासंदर्भात टाटा मेमोरियल हॉस्पीटलाचे अभिप्राय देण्यासाठी समितीने विचारणा केली असता टाटा मेमोरियलकडून असे सांगण्यात आले की, टाटा रुग्णालयात दर वर्षी उपचारासाठी ६५ हजार नवीन रुग्ण येत असतात. टाटा रुग्णालयात ३९% रुग्ण महाराष्ट्रातून आणि ६१% रुग्ण हे या राज्याबाहेरून देशाच्या कानाकोप-यातून येतात. या सर्वाना मुंबई सारख्या महाग शहरात सांभाळणे, रेल्वेने प्रवास करण्याचे अंतर व खर्च वाढतो. त्यामुळे त्यांची राहण्याची थोडी फार सोय केली पाहिजे त्यासाठी धर्मशाळा बांधण्याचा प्रकल्प देखील पुढे आला पाहिजे. त्यातील ६०% रुग्णांना संपूर्ण उपचार हे शासकीय सबसीडीने मिळतात. त्याचा उपचार दर्जा वर्ल्ड क्लास असतो. संस्थेकडे ६४० खाटा आहे. देशातील लोकसंख्या पहाता संपूर्ण देशभर शाखा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आहे. हॉस्पीटलने पंजाब, गुवाहटी येथे केंद्र सुरू केले आहेत. जसे मुंबईत आहेत त्याप्रमाणे काही प्रमाणात खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र राज्य येथे सुद्धा संशोधन व क्लिनिकल ट्रायल तसेच इंडोर उपचार मिळतात. काही कारणांमुळे हायड्रोजन बीम हा प्रकल्प खारघर येथे स्थंलातरित झाला आहे. त्यामुळे हाफकिन इन्स्टिट्यूटच्या जागेवर ५०० ते ६०० खाटांचे नवीन टाटा मेमोरियल हॉस्पीटल विकसित करता येईल. स्पेशालीटीचा सेंटर ऑफ एक्सलंन्स हाफकिन इन्स्टिट्यूटच्या नवीन इमारतीत सन २०२१ मध्ये करण्याच्या दृष्टीने आमचे सगळे प्रयत्न आहे. त्यासाठी डीएई कडून निधीचे वाटप झालेले आहे. हॉस्पीटलच्या परिसरामध्ये डॉ. बडवे आणि कार्यालय प्रशासनानी धर्मशाळा आणि हॉस्टेलची सोय केलेली आहे. ते आम्ही सीएसआर च्या मदतीने बांधू शकतो व त्याचे देखील काम सुरू झालेले आहे. पुढच्या पंधरा वर्षात रुग्णांचा आकडा कमी होण्यास अजून वेळ लागेल त्यामुळे सन २०३० पर्यंत १ लाख १० हजार नवीन कर्करोगाचे रुग्ण टाटा रुग्णालयात येतील. त्यासाठी नोव्हेंबर, २०१८ किंवा जानेवारी, २०१९ च्या दरम्यान नवीन बांधकामाचे चीफ इंजिनीअर टाटा हॉस्पीटल यांच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात येईल. टाटा हॉस्पीटलची जी दुसरी इमारत आहे त्याच्या बाजुला २५२ चौ.मी. ची जागा असून तेथे २५४ कुटुंब आहेत. त्यातील काही हे टाटा रुग्णालयातील वर्ग-चारचे कर्मचारी आहेत. ती जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेची असून त्याचा विकास झालेला नाही. टाटा हॉस्पीटल पासून ८०० मीटर अंतरावर शिवडी येथे महर्षी दयानंद कॉलेजच्या समोर दोन एकर पेक्षा जास्त जागा आहे त्यावर जवळपास ८०० झोपड्या बसलेल्या आहेत. त्यासाठी नगर विकास विभागाने कार्यवाही करून याबाबतचा प्रश्न निकाली काढावा त्यामुळे हॉस्पीटलच्या इमारती जवळ जवळ आल्याने वेळेत काम पूर्ण करू शकतो.

याबाबत जिल्हाधिकारी यांनी आपले म्हणजे समितीसमोर मांडले त्यात त्यांनी २०१३ मध्ये हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये बांधकामासाठी जी मुदत दिलेली आहे त्यावेळात बांधकाम पूर्ण न होऊ

शकल्याने शासन त्यावर शुल्क आकारणी करून त्यास मुदतवाढ देण्याबाबत आम्ही त्यांना कळविले आहे. त्यानुसार माननीय महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मुदतवाढीसाठी माफी केलेली आहे.

याबाबत समितीने टाटा मेमोरियल हॉस्पीटलच्या संचालकाना असे निदेश दिले की, हाफकिन इन्स्टिट्यूटच्या ५ एकर जमिनीवरती शासनातर्फे सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याने लवकरात लवकर रुग्णालय व धर्मशाळा बांधण्याचे काम पूर्ण करावे व त्यासाठी लागणारी मदत समिती आपणास करेल असे समितीने आपले मत व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

" मुंबईमध्ये देशभरातून उपचारासाठी आलेल्या कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय होण्याबाबत या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय विधानपरिषद सदस्य ॲड. हुस्नबानू खलिफे यांनी दिनांक ३१ जुलै २०१७ रोजी दिली. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रस्तुतचा अर्ज विधानपरिषद सभागृहास सादर केला असता सदर विनंती अर्ज सभागृहाने त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द केला आहे. विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक ४ ऑक्टोबर २०१७ रोजी व महसूल व वन (महसूल) विभागाकडून दिनांक २२ फेब्रुवारी २०१७ रोजी माहिती उपलब्ध झाली.

सार्वजनिक आरोग्य विभागाने, टाटा मेमोरिअल रुग्णालय हे कॅन्सरवरील उपचार देणारे केंद्र तसेच कॅन्सरचा प्रतिबंध, उपचार, शिक्षण आणि संशोधन यांच्याशी निगडीत भारतातील एक प्रमुख केंद्र असून सन १९६२ पासून सदर रुग्णालय केंद्र शासनाच्या अणुऊर्जा विभागामार्फत ग्रँट इन एड या तत्त्वावर अनुदानित असून भारत सरकार यांच्या अधिकार क्षेत्रात आहे. सद्यःस्थितीत राज्यातील विविध भागातून तसेच देशातील विविध भागातून उपचार घेण्याकरिता येणा-या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी या रुग्णालयामार्फत रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्यासाठी बोर्जेस होम, बांद्रा या ठिकाणी १५० खाटांची राहण्याची व्यवस्था केलेली आहे. त्याचप्रमाणे टाटा मेमोरिअल रुग्णालयामार्फत खाजगी स्वयंसेवी संस्था, चॅरिटेबल ट्रस्ट यांचीही याकामी मदत घेतली जाते. राज्य शासनाकडून हाफकिन या संस्थेकडून जमीन धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यासाठी या रुग्णालयाला उपलब्ध करून देण्यात आली असून त्यावर अंदाजित १५० खाटांची धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यात येणार आहे. तसेच खारघर, नवी मुंबई येथे देखील जागा उपलब्ध असून तेथे एकूण १५० खाटांचे नातेवाईकांना राहण्यासाठी धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यात येणार असल्याची लेखी माहिती समितीला पाठविण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे शासनाच्या महसूल व वन (महसूल) विभागाने शासन निर्णय क्र.जमीन-२५१२/१९६/ प्र.क्र. ७८/ज-२, दिनांक २१ फेब्रुवारी २०१३ अन्वये परेल, शिवडी विभागातील भूकर क्र. १/३३० व भूकर क्र. ३३० मधील ५ एकर जागा टाटा मेमोरिअल रुग्णालयासाठी बाल व महिला कॅन्सर रुग्णालय व हायड्रोन बीम थेरपीसाठी राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्याकरिता नाममात्र भुईभाड्याने ३० वर्षांसाठी मंजूर करण्यात आली होती. उक्त निर्णयातील अटी व शर्तीनुसार या जागेमध्ये हाफकिन संस्थेची निवासस्थाने येत असल्यामुळे या निवासस्थानांऐवजी टाटा मेमोरिअल सेंटरने दोन पर्यायी इमारती स्वखर्चाने बांधून देण्याचे ठरविले होते. तथापि, दोन इमारती बांधून देण्याऐवजी टाटा मेमोरिअल सेंटरने हाफकिन इन्स्टिट्यूटला ५ कोटी रुपये इतका निधी देण्याचे निश्चित केले असून त्यातील ३ कोटी रुपये देण्यात आले असून उर्वरित २ कोटी रुपये लवकरच देण्याचे समितीसमोर आश्वासित करण्यात आले आहे. टाटा मेमोरिअल सेंटरने दिनांक १२ फेब्रुवारी २०१७ रोजीच्या पत्रांन्वये कॅन्सर रुग्णालय बांधकामाकरिता दिलेल्या मुदतीत बांधकाम पूर्ण होण्याचे शक्य होणार नसल्याचे कळवून पाच वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली होती व सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला असून तो सद्यःस्थितीत विभागाने पुढे असेही कळविले आहे की, शासन निर्णयात सदर जमीन बाल व महिला कॅन्सर रुग्णालय व हायड्रोन बीम थेरपीसाठी राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्याकरिता मंजूर करण्यात आल्याचे नमूद केल्यामुळे संस्थेला या जमिनीवर निवासी डॉक्टरांची निवासस्थाने, रुग्णांकरिता धर्मशाळा व तत्सम सुविधा उभारण्याकरिता महानगरपालिका किंवा तत्सम प्राधिकरणांकडून परवानगी मिळण्यास अडचणी येत आहेत, यास्तव जमिनीच्या अनुज्ञेय वापराच्या प्रयोजनाचा निवासी डॉक्टरांची निवासस्थाने, रुग्णांसाठी धर्मशाळा व तत्सम आवश्यक सुविधा उभारण्याकरिता विस्तार करण्याची संस्थेची विनंती शासनाच्या विचाराधीन असून नगरविकास विभागाने यासंदर्भात अनुकूल अभिप्राय दिले असून सदरचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

टाटा मेमोरियल सेंटरला बाल व महिला कॅन्सर रुग्णालयासाठी हाफकिन इन्स्टिट्यूटची पाच एकर जागा फेब्रुवारी, २०१३ मध्ये शासन आदेश काढून दिलेली आहे. टाटा मेमोरियल सेंटरला हायड्रोन बीम थेरपीसाठी राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्यासाठी नाममात्र भुईभाड्याने ३० वर्षांसाठी जागा मंजूर करण्यात आली आहे. सन २०१३ मध्ये जेव्हां ही जागा देण्यात आली त्यावेळी एक अट होती की, या जागेमध्ये हाफकिनची निवासस्थाने आहेत त्या ऐवजी टाटाने हाफकिन इन्स्टिट्यूटला स्वतंत्ररित्या दोन इमारती स्टाफ कॉटर्स म्हणून बांधून द्याव्यात. तसे बांधून देणे शक्य नसल्यामुळे त्या अटीमध्ये पुन्हा बदल करण्यात आला आणि दोन इमारती बांधून देण्याऐवजी बांधकामाचा खर्च म्हणून

५ कोटी रुपये टाटा मेमोरियल सेंटरने हाफकिन इन्स्टिट्यूटला द्यावेत अशी अट सुधारीत करून दिली. टाटा मेमोरियल सेंटरने हाफकिन इन्स्टिट्यूटला ३ कोटी रुपये दिलेले आहेत व २ कोटी रुपये देणे बाकी आहे. हायड्रोन बीम थेरपीसाठी लागणारी जागा हाफकिन इन्स्टिट्यूट येथे उपलब्ध नाही असे टाटा मेमोरियल सेंटरच्या निदर्शनास आले त्यामुळे त्यानी ट्रीटमेंटची पद्धती बदलून द्यावी, हायड्रोन बीम थेरपी ऐवजी रेडियो थेरपी यापद्धतीस मान्यता मिळावी अशी विनंती शासनास केली होती. त्यास देखील शासनाने मान्यता दिली व सन २०१६ मध्ये शुद्धीपत्रक काढून वापरातील बदल अनुज्ञेय केला आहे. टाटा रुग्णालयात काम करणारे डॉक्टर्स यांची निवासस्थाने व रुग्णांच्या नातेवाईकांची निवासाची व्यवस्था असा अनुषंगिक बदल वापराच्या प्रयोजनामध्ये करून द्यावा अशी टाटा मेमोरियल सेंटरची विनंती शासनाकडे प्राप्त झाली होती. या विषयावर माननीय महसूल मंत्र्यांकडे बैठक देखील झाली. अशाप्रकारचे वापरातील बदल टाटा मेमोरियल सेंटरला अपेक्षित आहे. त्यासंबंधातील प्रस्ताव विभागाकडून शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. तो प्रस्ताव नजिकच्या काळात मान्य होईल व त्यानंतर वापराच्या बदलातील सुधारणा झाल्यावर तशा प्रकारचा आदेश त्यांना देण्यात येईल. टाटा मेमोरियल सेंटरची शासन स्तरावर "वापरातील बदल" ही एकच मागणी प्रलंबित आहे व त्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्री महोदयाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

टाटा मेमोरियल हॉस्पिटलला सन २०१३ मध्ये जागा देण्यात आली आहे तथापि, अद्याप बांधकामास सुरूवात करण्यात आली नाही कारण काही अपरिहार्य कारणामुळे हायड्रोन बीम थेरपी प्रकल्प प्रस्तावित ठिकाणाहून खारघर येथे नेण्यात आला त्यासाठी त्यांना पुन्हा शासनाकडे अर्ज करावा लागला, त्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या पातळीवर वेळ लागला आहे कारण दोन प्लॉट होते ते एकत्रित करण्यामध्ये वेळ गेलेला आहे, प्रॉपर्टी कार्डाचा देखील मुद्दा होता या सर्वामध्ये वेळ गेल्याने त्यांना बांधकामास सुरूवात करता आली नाही. त्यामुळे यामध्ये टाटा इन्स्टिट्यूटचा काही दोष आहे असे समितीला वाटत नाही. **तसेच सदर संस्था ही केंद्रशासनाची असून राज्यात चांगले सामाजिक कार्य करते आहे त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, शासनाने खास बाब म्हणून त्यांना झालेल्या विलंबाची निशुल्क माफी देण्यात येऊन जागा वापरण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी. जेणेकरून त्यांना सदर प्रकल्पाचे रुग्णांच्या निवासाचे बांधकाम लवकरात लवकर करता येईल. तसेच टाटा रुग्णालयानेही आता बांधकाम लवकरात लवकर करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी.**

विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे दिनांक ४ ऑक्टोबर २०१७ रोजी समितीने साक्ष घेतली. उक्त साक्षीत राज्याच्या अनेक भागांतून कॅन्सरवरील उपचारासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक

टाटा मेमोरिअल रुग्णालयात येत असतात. या रुग्णालयात अथवा आजूबाजूला रुग्णांची किंवा त्यांच्या नातेवाईकांची राहण्याची, शौचालय व आंघोळ इत्यादी मूलभूत सोयीसुविधा नसल्यामुळे सदर रुग्ण व नातेवाईक यांना या परिसरातील अक्षरशः फुटपाथवर राहून वास्तव्य करावे लागते. रुग्णांची नियमित तपासणी होत असल्याने त्यांना तपासणीसाठी वेगवेगळ्या तारखा दिल्या जातात व त्यासाठी त्यांना अधूनमधून गावी येणे-जाणे करावे लागते. मुंबईहून गावी जाणे येण्याच्या प्रवासाचे भाडे, आरक्षण इत्यादी अत्यंत गैरसोयीचे असते. त्यासाठी या रुग्ण व त्यांची देखभाल करणा-या नातेवाईकांची मुंबईतच या रुग्णालयाच्या परिसरात राहण्याची व्यवस्था होणे अत्यंत गरजेचे आहे. सदरची रुग्णालये केंद्र शासनामार्फत चालविली जात असून हे रुग्णालय महाराष्ट्रात असल्यामुळे आणि या रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे राज्य सरकारने रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवासाची व्यवस्था उभारणे अत्यंत गरजेचे आहे. राज्य शासनाने हाफकिनमध्ये या रुग्णालयाला पाच एकर जागा दिलेली आहे. मुंबईत आणखीही शासनाची जागा उपलब्ध असल्यास त्या शोधून या रुग्णालयाला उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न झाला पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी राज्य शासनाने सदरची पाच एकर जागा टाटा मेमोरिअल संस्थेला सन २०१३ मध्ये दिली होती. सदरची जागा हायड्रोन बीम प्रकल्प व १५० खाटांचे विस्तारित रुग्णालय याकरिता दिली होती. परंतु या बाबीसाठी या जागेचा वापर करावयाचा होता त्यासाठी ही जागा काही तांत्रिक अडचणींमुळे अपुरी पडणार होती. त्यामुळे प्रस्तावित बांधकामास संस्थेकडून विलंब झाला. सन २०१६ मध्ये उक्त संस्थेने महिला व बाल कॅन्सर रुग्णालयासाठी या जागेचा वापर बदलविला व त्यासाठी राज्य शासनाने उक्त प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे.

टाटा मेमोरिअल हॉस्पीटलमध्ये कॅन्सरवरील उपचारासाठी राज्याच्या कानाकोप-यातून तसेच देशातील इतर भागातूनही मोठ्या प्रमाणावर रुग्ण व त्यांच्या समवेत त्यांचे नातेवाईक उपचारासाठी येत असतात. सदर रुग्ण व त्यांचे नातेवाईक बहुतांश गरीब, गरजू व दुर्बल घटकातील असतात हे आर्थिकदृष्ट्या अत्यंत कमकुवत लोक असून त्यांना उपचारासाठीच पैसे उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या राहण्याचा, खाण्यापिण्याचा व इतर मूलभूत सोयीसुविधांचा अभाव या रुग्णालयाच्या परिसरात व मुंबईत सद्यःस्थितीच्या परिस्थितीत होणे अत्यंत दुरापास्त आहे. संविधानात प्रत्येक व्यक्तीच्या जिवितास समान अधिकार बहाल केला असल्याने या रुग्णांनाही या रुग्णालयातील सेवेचा लाभ घेणे सुकर व्हावे यासाठी मूलभूत सोयीसुविधासुद्धा निर्माण करून देणे हे संघराज्यातील प्रत्येक कल्याणकारी राज्याचे कर्तव्य आहे. मुंबई शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे असल्यामुळे येथील

निवासाची व्यवस्था अत्यंत महागडी असल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मुंबईतील लांबवरचा प्रवास व निवासाचा विचार करता तसेच गुंतागुंतीची व लोकल ट्रेनच्या गर्दीतील गैरसोई तसेच महागडी टॅक्सी व रिक्षाची वाहतूक व्यवस्था लक्षात घेता टाटा मेमोरिअलकडे येणे अत्यंत गैरसोयीचे व खर्चिक आहे. या गैरसोय व खर्चिक बाबींमुळे अनेक रुग्ण मुंबईत या रुग्णालयाकडे येण्याचे टाळतात व दुर्धर आजारामुळे कैकवेळा अशा रुग्णांचा मृत्यू देखील होतो. या सर्व बाबी विचारात घेता टाटा मेमोरिअल रुग्णालयाच्या परिसरात कॅन्सरग्रस्त रुग्ण व त्याच्या किमान एका साथीदारास मूलभूत सोयीसुविधांसह (शौचालय, स्नानगृह, निवास) राहण्याची व्यवस्था होणे अत्यंत आवश्यक आहे व राज्य शासनाने त्यासाठी अग्रक्रमाने पावले उचलणे आवश्यक आहे.

केंद्र व राज्य शासनाद्वारे कॅन्सरग्रस्त रुग्णांना उपचाराकरिता मोठ्या प्रमाणावर निधीच्या माध्यमातून अनुदान दिले जाते. हा निधी केवळ उपचारासाठी असतो त्यात रुग्ण व नातेवाईकांच्या निवासाचा विचार केलेला नाही. रुग्णांना त्यांची सुश्रुषा करण्यासाठी एका सोबत्याची गरज असते. कारण रुग्ण व तो सोबती हे दोघेही या आजाराचे नाव ऐकूनच धास्तावलेले असतात. अशा परिस्थितीत मुंबईत आलेले असताना त्यांना या शहरातील अन्य रहिवाश्यांची मदत होईलच असे नाही. ज्या व्यक्ती सधन आहेत त्या खाजगी रुग्णालयात किंवा टाटा रुग्णालयात सहज उपचार घेऊ शकतात. कारण त्यांची आर्थिक स्थिती ही सबळ असल्यामुळे त्यांना निवासाच्याबाबतीत परावलंबी व आर्थिक बाबीवर दुस-यांवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नसते. परंतु गरीब, दुर्बल व आर्थिकदृष्ट्या मागास तसेच गरजू व्यक्तींच्या निवास व इतर मूलभूत सोयीसुविधांच्या व्यवस्थेची जबाबदारी शासनानेच उचलणे गरजेचे आहे व तद्नुषंगाने शासनाद्वारे तत्परतेने यासंदर्भात कार्यवाही होणे समितीला अगत्याचे वाटते. या अनुषंगाने शासनाच्या महसूल व वन (महसूल) विभाग तसेच टाटा रुग्णालयाचे व्यवस्थापन यांनी रुग्णालयाच्या विस्तारासाठी केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने समिती समोर आलेल्या माहितीत हाफकिन इन्स्टिट्युट, परेल, मुंबई येथील सुमारे पाच एकर जागा टाटा मेमोरिअल रुग्णालयास शासनाने सन २०१३ मध्ये हस्तांतर केली असून ज्या कारणासाठी ही जागा शासनाने दिली आहे त्या कारणासाठी सदर संस्थेने वापर केला नसल्याने महिला व बाल कॅन्सर रुग्णालयाचे बांधकाम अद्यापही झालेले नाही. रुग्णालय प्रशासनाने सन २०१६ मध्ये अगोदरच्या प्रस्तावात बदल करून दुसरा सुधारित प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून तो शासनाच्या विचाराधीन असल्याचे समितीसमोर आलेल्या माहितीत दिसून येते. अशा प्रस्तावांना तातडीने मंजुरी देत असताना त्यात मुंबईत राज्य व देशातील विविध भागांतून येणा-या अनेक गरजू व दुर्बल घटकातील कॅन्सर रुग्ण व त्यांचे नातेवाईकांचा निवासाचा मुद्दा विचारात घेणे अत्यंत अगत्याचे आहे असे

समितीला प्रकर्षाने वाटते. यासाठी सर्व संबंधित विभागाने तत्परतेने व समन्वयाने अत्यंत न्यायी व समन्वयी भूमिका बजावून या कामास हातभार लावून मंजुरी प्रदान करण्याकामी सत्वर भूमिका घेऊन मुंबईत कॅन्सरवरील उपचारासाठी येणारे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी निवासाची बिकट अवस्था लक्षात घेता महिला व बाल कॅन्सर रुग्णालयाचे बांधकाम करताना कॅन्सर रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकरिता तात्पुरत्या निवा-याची व्यवस्था करावी. **शासनाने वाढीव चटई क्षेत्र देऊन टाटा रुग्णालयाने यासंदर्भातील बांधकाम तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने महिला व बाल कॅन्सर रुग्णालय, वाढीव खाटा, डॉक्टर व कर्मचा-यांचे निवासस्थान, त्यात रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवास व्यवस्था इत्यादीबाबत नवीन दोन इमारतींचा एक सर्वंकष प्रस्ताव रुग्णालय व्यवस्थापनाने तयार करून त्यास सर्व संबंधितांनी मान्यता द्यावी व शासनस्तरावर उपरोक्त नमूद केलेल्या जागेसंदर्भातील चटई क्षेत्रवाढ व वर नमूद केलेले प्रस्ताव इत्यादीबाबत संबंधित सर्व विभागांनी समन्वय ठेवून तातडीने प्रस्तावास मंजुरी घेण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यांत पाठविण्यात यावी.**

परिशिष्ट एक

# मूळ विनंती अर्ज

# परिशिष्ट-एक

श्रीमती हुस्नबानू खलिफे,
वि.प.स.

विधानपरिषद
महाराष्ट्र

महाराष्ट्र विधानपरिषद
प्रति :

मा. सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

विषय :- **मुंबईमध्ये देशभरातून उपचारासाठी आलेल्या कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय होण्याबाबत.**

मा. महोदय,

भारतामध्ये प्रतोवर्षी ४.७ लाख कॅन्सरचे नविन रुग्ण आढळून येत असून त्यापैकी साधारणत: ३.५ लाख रुग्ण दगावत असल्याचे दिसून येते. मुंबईतील टाटा मेमोरियल हॉस्पीटलमध्ये कॅन्सरच्या उपचारासाठी वाजवी दरात उच्च प्रतिचा उपचार होत असल्यामुळे व गोरगरीब नागरीकांना उपचारासाठी मुंबई शहर सोईचे असल्याने, महराष्ट्रातील तसेच देशातील अनेक राज्यांतील नागरीक मुंबईमध्ये येत असतात. परंतु कॅन्सर रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी राहण्याची कोणतीच सोय या भागात दिसून येत नाही. त्यामुळे रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांना रुग्णाच्या उपचारावरील खर्चासाहेबतच राहण्यासाठी देखील प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागते.

यासंदर्भात आपणास विनंती आहे की, सदरचा अर्ज विनंती अर्ज समितीकडे आपल्या शिफारशींसह **पाठवण्यात यावा, ही विनंती.**

आपली,

( श्रीमती हुस्नबानू खलिफे )
वि.प.स.

**सभापती**
महाराष्ट्र विधानपरिषद

विनंती अर्ज समिती

# MAHARASHTRA PRADESH CONGRESS COMMITTEE

**SANTOSH ARJUN KENE**
Delegate : MPCC Convenor : MPCC (O.B.C.) Cell
Ex. Corporator : KDMC President : Dombivli Sanskrutik Pratisthan
Vice President : Rotary Club of Dombivli Uptown
un Smruti Bunglow, Ayre Road, Dombivli (E) 421 201 M. : 9833462377 | 9322350203 E-mail : santosh.kene@gmail.com

प्रति,
श्रीमती हुस्नबानू खलिफे,
वि. प. स, विधानभवन,
मुंबई.

**विषय :- मुंबईमध्ये देशभरातून उपचारासाठी आलेल्या कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय होण्याबाबत.**

**महोदय,**

भारतामध्ये प्रतिवर्षी ४.७ लाख कॅन्सरचे नविन रुग्ण आढळून येत असून त्यापैकी साधारणतः ३.५ लाख रुग्ण दगावत असल्याचे दिसून येते. मुंबईतील टाटा मेमोरियल हॉस्पीटलमध्ये कॅन्सरच्या उपचारासाठी वाजवी दरात उच्च प्रतिचा उपचार होत असल्यामुळे व गोरगरीब नागरीकांना उपचारासाठी मुंबई शहर सोईचे असल्याने, महाराष्ट्रातील तसेच देशातील अनेक राज्यांतील नागरीक मुंबईमध्ये येत असतात. परंतु कॅन्सर रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी राहण्याची कोणतीच सोय या भागात दिसून येत नाही. त्यानुळे रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांना रुग्णाच्या उपचारावरील खर्चासाहेबतच राहण्यासाठी देखील प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागते.

यासंदर्भात आपणास विनंती आहे की, कॅन्सर तसेच इतर गंभीर आजाराच्या उपचारांसाठी रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांच्या राहण्याची उपाययोजना होण्याबाबत शासनस्तरावरून आवश्यक कार्यवाही करणेसंदर्भात आदेश पारीत व्हावेत, ही विनंती.

आपले विश्वासू,

१) संतोष केणे (सही) 9833462377/9322350203
२) राहुल केणे (सही)
३) पांडुरंग भोईर (सही)
४) मंगेश भगत (सही)
५)

महाराष्ट्र विधानपरिषद

विधानपरिषद महाराष्ट्र

श्रीमती हुस्नबानू खलिफे,
वि.प.स.

प्रति,

**प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

**विषय :- "औचित्याचा मुद्दा" सभागृहात उपस्थित करण्याकरिता परवानगी मिळणेबाबत.**

महोदय,

मी, खालील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर "औचित्याचा मुद्दा" सभागृहात उपस्थित करु इच्छितो, कृपया परवानगी मिळावी, ही विनंती.

"भारतामध्ये प्रतीवर्षी ४.७ लाख कॅन्सरचे नविन रुग्ण आढळून येत असून त्यापैकी साधारणतः ३.५ लाख रुग्ण दगावत असल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील टाटा मेमोरियल हॉस्पीटलमध्ये कॅन्सरच्या उपचारासाठी वाजवी दरात उच्च प्रतिचा उपचार होत असल्यामुळे व गोरगरीब नागरीकांना उपचारासाठी मुंबई शहर सोईचे असल्याने, महाराष्ट्रातील तसेच देशातील अनेक राज्यांतील नागरीक मुंबईमध्ये येत असणे, परंतु कॅन्सर रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी राहण्याची कोणतीच सोय या भागात दिसून येत नसणे, त्यामुळे रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांना रुग्णाच्या उपचारावरील खर्चासाहेबतच राहण्यासाठी देखील प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागत असणे, **मुंबईत टाटा मेमोरियल हॉस्पीटलच्या परिसरात कॅन्सर रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी राहण्याची सोय होण्याबाबत कार्यवाही व्हावी**, अशी मागणी मी, या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे. "

दिनांक 26-6-16 रोजा
म./दु./सं. 11:01 वाजता
नियम ९३ अन्वये सूचना / नियम २८९ अन्वये सूचना/
औचित्याचा मुद्दा / विशेष उल्लेख सूचना मिळाली.

सचिव यांचे स्वीय सहायक
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई / नागपूर

आपली,

( श्रीमती हुस्नबानू खलिफे )

## परिशिष्ट दोन

# विभागाने सादर केलेली माहिती

## परिशिष्ट-दोन अ

**मा.ॲड- हुस्नबानू खलीफे यांनी उपस्थित केलेला औचित्याचा मुददा.**

भारतामध्ये प्रतिवर्षी ४.७ लाख कॅन्सरचे नवीन रुग्ण आढळुन येत असुन त्यापैकि साधारणतः ३.५ लाख रुग्ण दगावत असल्याचे निदर्शनास आले आहे. मुंबईतील टाटा मेमोरीअल रुग्णालयांमध्ये कॅन्सरचा उपचार वाजवी दरात च उच्च प्रतिचा होत असल्यामुळे आणि गोर गरीब नारिकांना उपचारासाठी मुंबई शहर सोईचे असल्याने महाराष्ट्रातील तसेच देशातील अनेक राज्यातील नागरीक मुंबईत उपचारासाठी येतात. परंतु कॅन्सर रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी राहण्याची कोणतीच सोय या भागात नाही. त्यामुळे रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांना रुग्णांच्या उपचारावरील खर्चासोबत राहण्यासाठी देखील प्रचंड खर्च सोसावा लागतो. मुंबईत टाटा मेमोरीअल रुग्णालयाच्य परिसरात कॅन्सर रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी राहण्याची सोय होण्याबाबत कार्यबाही व्हावी, अशी मागणी मी या औचित्याच्या मददृाव्दारे शासनास करीत आहे.

---

**अभिप्राय**

टाटा मेमोरीअल रुग्णालय हे परेल, मुंबई येथे स्थित आहे. कॅन्सर वर उपचार देणारे केंद्र तसेच कॅन्सरचा प्रतिबंध, उपचार, शिक्षण आणि संशोधन याच्याशी निगडीत भारतातील एक प्रमुख केंद्र आहे. १९६२ पासुन सदर रुग्णालय अणुउर्जा विभागांमार्फत ग्रॅट-इन-एड इन्स्टिटयूट असुन ही संपूर्णपणे अणुउर्जा विभागामार्फत अनुदानीत आहे व अणु उर्जा विभाग, भारत सरकार यांच्या अधिकार क्षेत्रात आहे.

सद्यपरिस्थितीत टाटा मेमोरीअल रुग्णालयामार्फत रुग्णांच्या नातेवाईकांसाठी राहण्यासाठी बोरजेस होम, बांद्रा या ठिकाणी १५० खाटांची राहण्याची व्यवस्था केलेली आहे. टाटा मेमोरीअल रुग्णालय येथे देशातील तसेच राज्यातील विविध विभागातुन लोक हे उपचार घेण्याकरीता येतात.

रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांच्या राहण्याची अपुरी सोय लक्षात घेता टाटा मेमोरीअल रुग्णालयामार्फत खाजगी स्वयंसेवी संस्था, चारिटेबल ट्रस्ट यांची ही मदत घेतली जाते.

राज्य शासनाकडुन हाफकिन हया संस्थेमधील जमीन धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यासाठी टाटा मेमोरीअल रुग्णालयाला उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर जागेवर

रुग्णांना व रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्यासाठी अदांजित १५० खाटांचे धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यात येणार आहे.

खारघर, नवी मुंबई येथ टाटा मेमोरीअल रुग्णालयाच्या ॲडव्हॉन्स सेंटर फॉर ट्रिटमेंट, रिसर्च आणि एज्यूकेशन सेंटर मध्ये धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यासाठी जागा उपलब्ध असुन तेथे एकुण १५० खाटांचे नातेवाईकांना राहण्यासाठी धर्मशाळा कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यात येणार आहे.

**परिशिष्ट-दोन ब**

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक- जमीन-२५१६/सं.क्र.९७३/ज-२,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय,मुख्य इमारत,१ला मजला,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०००३२.
दिनांक:-२२.२.२०१८

प्रति,

अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
मुंबई-४ ०० ०३२.

**विषय:- जमीन —मुंबई शहर**
मुंबईमध्ये देशभरातून उपचारासाठी आलेल्या कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय होण्याबाबत" या विषयावरील ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांचा विनंती अर्ज.

**संदर्भ:-** आपले पत्र क्र.४८७५/म.वि.स/विपविअस/ड-१५, दि.२०.२.२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. उपसभापती तथा समिती प्रमुख यांनी दिलेल्या निदेशानुसार दि.२३.२.२०१८ रोजी आयोजित विधानपरीषद विनंती अर्ज समितीच्या बैठकीच्या अनुषंगाने विनंती अर्जातील विषयाबाबतच्या अद्ययावत माहितीच्या ४० प्रती या पत्रासोबत आपणास उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

आपला,

(सु.दे.आगरकर)
कक्ष अधिकारी

**विषय:- जमीन- मुंबई शहर**

मुंबईमध्ये देशभरातून उपचारासाठी आलेल्या कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय होण्याबाबत." या विषयाबाबत ॲड हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांचा विनंती अर्ज.

**मा. उपसभापती तथा समितीप्रमुख यांनी शुक्रवार दि.२३ फेब्रुवारी, २०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीची टिप्पणी.**

---

- शासन निर्णय, क्र. जमीन-२५१२/१९६/प्र.क.७८/ज-२, दि.२१.२.२०१३ अन्वये परेल शिवडी विभागातील भूकर क्र.१/३३० व भूकर क्र.३३० मधील पाच एकर जागा टाटा मेमोरियल सेंटरला बाल व महिला कॅन्सर रुग्णालय व हायड्रोन बीम थेरपीसाठी राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्याकरीता नाममात्र भुईभाड्याने ३० वर्षांसाठी मंजूर करण्यात आली होती.
- या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार या जागेमध्ये हाफकिन संस्थेची निवासंस्थाने येत असल्याने या निवासंस्थाना ऐवजी टाटा मेमोरियल सेंटरने हाफकिन संस्थेस दोन पर्यायी इमारती स्वखर्चाने बांधून द्याव्यात असे ठरले होते.
- तथापि, दि.५.९.२०१३ च्या शुध्दिपत्रान्वये या पर्यायी इमारतींऐवजी टाटा मेमोरियल सेंटरने हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, परळ, मुंबई या संस्थेस ठोक स्वरुपात रुपये पाच कोटी रक्कम सुपूर्द करण्याबाबत आदेश झाले.
- तद्नंतर टाटा मेमोरियल सेंटरमार्फत उभारण्यात येणाऱ्या *हायड्रोन बीम थेरपीसाठी* आवश्यक असलेली जागा व त्यातून प्रसारीत होणारी किरणोत्सारीता यांचे प्रमाण विचारात घेता *हायड्रोन बीम थेरपी* ऐवजी *रेडिओ थेरपी* या उपचार पध्दतीस मान्यता देण्याबाबत दि.२९ ऑगस्ट, २०१६ च्या शुध्दिपत्रान्वये सुधारणा करण्यात आली.
- टाटा मेमोरियल सेंटरमार्फत दि.१२.९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना कॅन्सर रुग्णालय बांधकामाकरिता दिलेल्या मुदतीत बांधकाम पुर्ण होणे शक्य नसल्याचे कळवून रुग्णालय बांधणेकरीता पाच वर्षांची मुदतवाढ देण्याबाबत शासनास विनंती करण्यात आलेली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.जमीन-२०१६/प्र.क्र.२५४/ज-१, दि.११.१.२०१७ मधील तरतुदीनुसार टाटा मेमोरियल सेंटर यांचा बांधकाम मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव उचित कार्यवाहीकरीता शासनाच्या पत्र दि.७.११.२०१७ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

- मुख्य प्रशासकीय अधिकारी, टाटा मेमोरियल सेंटर परळ, मुंबई यांचे दि.१.११.२०१७ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, संदर्भाधिन दि.२१.२.२०१३ च्या शासन निर्णयात मुद्दा क्र.२ येथे सदर जमीन बाल व महिला कॅन्सर रुग्णालय व हायड्रोन बीम थेरपीसाठी राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्याकरीता मंजूर करण्यात आल्याचे नमूद केल्यामुळे संस्थेला या जमिनीवर निवासी डॉक्टरांची निवासस्थाने, रुग्णांसाठी धर्मशाळा व तत्सम आवश्यक सुविधा उभारण्याकरीता महानगरपालिका किंवा तत्सम प्राधिकरणांकडून परवानगी मिळण्यास अडचणी येत आहेत, यास्तव जमिनीच्या अनुज्ञेय वापराच्या प्रयोजनाचा निवासी डॉक्टरांची निवासस्थाने, रुग्णांसाठी धर्मशाळा व तत्सम आवश्यक सुविधा उभारण्याकरीता विस्तार करण्याची संस्थेची विनंती शासनाच्या विचाराधीन होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने नगर विकास विभागाने अनुकूल अभिप्राय दिलेले असून नस्ती शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली आहे.

परिशिष्ट तीन

# समितीच्या बैठका

**पहिली बैठक**

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक बुधवार, दिनांक ४ ऑक्टोबर २०१७ रोजी दुपारी १२-३० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**विशेष निमंत्रित**

(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव.

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी :**

(१) डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(२) श्री. राजेंद्र क्षीरसागर, सहसचिव, महसूल व वन (महसूल) विभाग

(३) श्री. मनोहर ठोंबरे, सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्री. सं. श. गोखले, उप सचिव, नगरविकास विभाग

(५) श्री. संजय निरभवणे, जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, मुंबई

(६) श्री. विश्वास मोटे, सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

(७) डॉ. साधना तायडे, अतिरिक्त संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग

(८) श्री. संजीव सुद, संचालक, टाटा मेमोरियल हॉस्पीटल

(९) श्री. राजेंद्र पाटील, मुख्य प्रशासन अधिकारी, टाटा मेमोरियल हॉस्पीटल

**जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई :**

(१) श्री. पवन चांडक, तहसीलदार, मुंबई उपनगर.

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव (सार्वजनिक आरोग्य, नगरविकास), तहसीलदार मुंबई व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

## दुसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक शुक्रवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०१८ रोजी दुपारी ३-३० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(१) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. संजय कांबळे, अवर सचिव. (समिती)

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी :**

(१) श्री. राजेंद्र क्षीरसागर, सहसचिव, महसूल व वन (महसूल) विभाग

(२) श्री. सं. श. गोखले, उप सचिव, नगरविकास विभाग

(३) श्री. महेश इंगळे, अधीक्षक, मुंबई नगर मूल्यापन व भूमी अभिलेखे, मुंबई

(४) श्री. एस. डी. महाजन, कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, मुंबई

(५) डॉ. पिनाकिन गुज्जर, अतिरीक्त अध्यक्ष, नायर हॉस्पीटल, मुंबई

(६) डॉ. अविनाश सुपे, अध्यक्ष, के. ई. एम्स. हॉस्पीटल, मुंबई

(७) श्री. संजीव सुद, प्रबंधक, टाटा मेमोरियल हॉस्पीटल, मुंबई

(८) श्री. राजेंद्र पाटील, मुख्य प्रशासन अधिकारी, टाटा मेमोरियल हॉस्पीटल, मुंबई

(९) श्री. शैलेश श्रीखंडे, टाटा मेमोरियल हॉस्पीटल, मुंबई

**जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई :**

(१) श्रीमती संपदा मेहता, जिल्हाधिकारी, मुंबई शहर

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय प्रधान सचिव (महसूल), प्रभारी सचिव (नगरविकास), जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

## तिसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० मार्च २०१८ रोजी दुपारी १-०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(१) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव.

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव. (समिती)

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

सदर बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचारविनिमय करून तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई